दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-४७ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १९ जून २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# लोकार्पण झाल्यानंतरही दिवा-आगासन रस्ता आणि मुख्य जलवाहिनीच्या कामात विघ्न

## पालिकेच्या ढिसाळ कारभाराचा नागरिकांना फटका

## पालिकेच्या कारभारावर विरोधकांसह नागरिकांचीही टिका




### मग घाईघाईने उदघाटन का केले?

*"उदघाटन झालेला रस्ता खोदावा लागतो,मुख्य जलवाहिनीचे लोकार्पण होऊनही लोकांना पाणी मिळत नाही हा ढिसाळ कारभाराचा नमुना आहे.जर पाईपलाईन आणि मुख्य रस्त्याची कामे अर्धवट होती, तर घाई गडबडीत लोकार्पण का करण्यात आले?दिव्याला पाणी मिळणार सांगून येथील जनतेची गर्दी का जमवली? संबंधित पालिका अधिकारी आणि कंत्राटदारावर कारवाई व्हायला हवी!*

**– ज्योती पाटील,** भाजप

*"पालिकेचा पाणीपुरवठा विभाग आणि बांधकाम विभाग यांच्यात समन्वय नसल्याचे हे उदाहरण असून पालिकेच्या संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारावर कारवाई करायला हवी. दिव्याला गृहीत धरण्याचा प्रकार यापुढे खपवून घेतला जाणार नाही. दिव्यात सध्या हम करे सो कायदा अशा पद्धतीचे काम चालू आहे!*

**– प्रशांत गावडे,** मनसे

***दिवा:– काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवा शहरात लोकार्पण केलेल्या दिवा आगासन रस्ता आणि मुख्य जलवाहिनी जनतेच्या सेवेत दाखल होण्यात वारंवार अडचणी येत आहेत.लोकार्पण झाल्यानंतर अवघ्या काही दिवसात पुन्हा दिवा– आगासन रस्ता खोदावा लागला असून यामुळे पालिकेच्या कारभाराची पोलखोल झाली आहे.***

मोठा गाजावाजा करत पालिकेने दिव्यातील विविध विकास कामांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते केले. मात्र या विकास कामांमध्ये असणारा गलथान कारभार आता समोर येत असून घाई गडबडीत करण्यात आलेल्या कामांमुळे याचा फटका आता नागरिकांना बसत आहे. मुख्यमंत्र्यांनी लोकार्पण करण्याआधीच नवीन जलवाहिनी लिकेज झाल्याने लोकार्पणाच्या दिवशी रस्ता खोदावा लागला होता. त्यानंतर आता पुन्हा रस्त्याखाली असणारे पाण्याचे वॉलचे झाकण लावण्यासाठी पालिकेच्या संबंधित विभागाने रस्ता खोदायला घेतल्याचे सांगितले जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. यामुळे पालिकेच्या संबंधित विभागांचा समन्वय नसल्याचे उघड होत असून शहरातील पालिकेचा गलथान कारभार चव्हाट्यावर येत आहे.

यासंदर्भात महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांशी बोलल्या नंतर त्यांनी सांगितले की, रस्त्याच्या खाली असलेल्या जलवाहिनीच्या वॉल्व्हला चेंबर बनवण्यासाठी रस्ता खोदण्यात आलाय. त्यांच्या म्हणण्यानुसार इथे असलेल्या वॉल्वची माहिती दिल्यानंतर तिथे चेंबर बनविण्यासाठी माप घेण्यात आले होते. पण कंत्राटदार आणि महापालिका अधिकाऱ्यांनी रस्ता बनवताना त्याचा विचार न करता सरसकट रस्त्यावर काँक्रेट टाकून रस्ता बनवून टाकला.एकंदरीत महापालिकेच्या कारभारात समन्वय नसल्याचे यावरून स्पष्ट होत आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी पाणीपुरवठा अधिकारीवाघिरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, जिथे रस्ता खोदण्यात आला आहे तिथे चेंबर बांधायचा आहे.याची कल्पना बांधकाम विभागाला देण्यात आली होती. तिथे व्हॉल्व साठी चेंबर बांधणे गरजेचे असल्याने रस्ता खोदण्यात आल्याचे वाघिरे यांनी सांगितले.


नियमित प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज वर्तमानपत्र...
लवकरच 3 ऱ्या वर्षात पदार्पण करत आहे...

दिवा न्यूज

लवकरच नव्या स्वरूपात...

# शहापूर पंचायत समिती तिसऱ्या क्रमांकावर

## कोकण विभागस्तरीय पुरस्कार

**ठाणे:** यशवंत पंचायत राज अभियान सन २०२२-२०२३ मध्ये राज्यातील अति उत्कृष्ठ जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना विभाग व राज्यस्तरावर पूरस्कार प्रदान करण्यात येत असतो. त्यानुसार यंदाच्या वर्षी कोकण विभागस्तरीय पुरस्कारामध्ये शहापूर पंचायत समिती तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले असून त्यांना उत्कृष्ट पंचायत समिती म्हणून पुरस्कार जाहीर झालेला आहे.

२०२१-२०२२ या अहवाल वर्षामध्ये केलेल्या कामाचे मुल्यमापन विचारात घेऊन विभागस्तर व राज्यस्तर अशा दोन स्तरावर ''यशवंत पंचायत राज अभियान'' ही अभिनव पुरस्कार योजना यावर्षी देखील राबविण्यात आली होती. अभियानांतर्गत राज्यातील तीन पंचायत समित्यांची पुरस्कारासाठी राज्य स्तरावर निवड करण्यात येते व विभाग स्तरावर तीन पंचायत समित्यांची निवड करण्यात येते. यामध्ये पंचायत राज प्रशासन व विकास कार्यात उत्कृष्ठ काम करणाऱ्या पंचायत समित्यांची निवड केली जाते.

पंचायत समितीच्या किमान सभेचे आयोजन करणे, पंचायत समिती रचना व कार्यपद्धती, कर्मचारी व्यवस्थापन, अंगणवाडीतील मूलभूत सुविधा, परिसर सुधारणा, आरोग्य विभागाकडील प्रसुतीपुर्व नोंदणी व तपासणी, संस्थात्मक प्रसुती, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, ग्रामीण गृह निर्माण (प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास योजना, रमाई आवास योजना इत्यादी) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नत्ती अभियान, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत हगणदारी मुक्त गाव, सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन, बेसलाईन सर्व्हे बाहेरील कुंटुंबाचे शौचालय बांधकाम, म.ग्रा.रो.ह.योजना अंतर्गत मनुष्य दिवस निर्मिती यासारख्या कामामध्ये उल्लेखनीय केलेल्या कामाची दाखला घेवून पंचायत समिती शहापूरला कोकण विभागीय स्तरावराचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार महाराष्ट्र शासनाकडून जाहीर झालेला आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याबाहेर रिक्षाचालकाचा आत्महत्येचा प्रयत्न

**ठाणे:** रिक्षाचा नवीन परवाना नाकारण्यात आल्याने विनय पांडे नामक रिक्षाचालकाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील बंगल्याच्या बाहेर रस्त्यावर अंगावर रॉकेल ओतून घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. पांडे हा शिंदे गटाचा पदाधिकारी असल्याचे बोलले जात असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. तसेच बंगल्याबाहेर मोठया प्रमाणात पोलीस बंदोबस्त असल्याने पोलिसांनी धाव घेतल्याने अनर्थ टळले. हा प्रकार शनिवारी सकाळी घडला. मुख्यमंत्रीही एकेकाळी रिक्षा चालवत असल्याने मुख्यमंत्र्यांना आमची व्यथा कळू शकते, असे या रिक्षाचालकाचे म्हणणे आहे.

ठाण्यातील लुईसवाडी येथील मुख्यमंत्र्यांच्या निवास्थानाच्या बाहेर महापालिकेने खरेदी केलेल्या यांत्रिक पद्धतीने सफाई करणाऱ्या दोन मशीनचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. हा कार्यक्रम सकाळी साडेआठच्या दरम्यान पार पडल्यावर मुख्यमंत्री ठाण्यातून मुंबईला रवाना झाल्यानंतर पांडे नामक रिक्षाचालक त्या ठिकाणी आला आणि स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. त्या ठिकाणी बंदोबस्ताला असलेल्या पोलिसांनी वेळीच धाव घेत हा सर्व प्रकार आटोक्यात आणला. त्यानंतर रिक्षाचालक विनय पांडे याला वागळे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

काही दिवसांपूर्वी रिक्षाचालकांचे एक आंदोलन झाले होते त्यामध्ये विनय पांडे हा देखील सहभागी झाला होता. त्यामुळे आंदोलनात सहभागी झाल्याने त्याच्यावरही गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा दाखल असल्याने रिक्षाचा नवीन परवाना त्याला नाकारण्यात आला असल्याचे पांडे यांचे म्हणणे आहे. विनय पांडे या शिवसेनेचा पदाधिकारी असून तो मुख्यमंत्र्यांच्याच मतदार संघातील असल्याची माहिती समोर येत आहे.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# खाजगी कंपनीसाठी परीक्षा शुल्काची भरती ..

# बेरोजगार उमेदवारांच्या खिशाला ओहोटी

## परीक्षा शुल्कामध्ये झालेली भरमसाठ वाढ त्वरीत कमी करा

## मनविसेनेतर्फे मुख्यमंत्र्यांना मागणी

**ठाणे : राज्य उत्पादन शुल्क, वनविभाग व पशुसंवर्धन विभाग अंतर्गत भरती होणाऱ्या पदांसाठी उमेदवारांकडून १ हजार रूपये परीक्षा शुल्क आकारले जात आहे. सरकारने परीक्षा शुल्कामध्ये प्रचंड वाढ केल्याने बेरोजगारीमुळे आर्थिक परिस्थितीचा सामना करत असलेल्या उमेदवारांना मात्र या शुल्क वाढीचा भुर्दंड बसत आहे. सरकारने हे शुल्क नाममात्र १०० रूपये इतके करावी अशी मागणी मनविसेचे राज्य सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

राज्यात मोठ्या कालावधीनंतर शासनातर्फे भरती प्रक्रिया राबवली जात आहे. सध्या बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले असल्याने परीक्षार्थींचा आर्थिक ताण देखील वाढलेला आहे. भरती प्रक्रिया खाजगी कंपनी मार्फत राबविले जाते. लेखी परीक्षेकरिता आकारण्यात येणारे १ हजार रूपये शुल्क अवाजवी आहे . वन विभागामध्ये २४१७ तसेच पशुसंवर्धन विभाग अंतर्गत भरण्यात येणाऱ्या ४४६ व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ५१२ जागांकरिता ९०० ते १००० रूपये परीक्षा शुल्क शासनातर्फे आकारण्यात येत आहे. वन रक्षक, लेखापाल, सर्वेअर,स्टेनो, लघुलेखक, लघुटंकलेखक अशा पदासाठी भरती होत आहे . बरेचसे उमेदवार एका पेक्षा जास्त जागांकरिता पात्र असल्याने २ ते ३ विभागात अर्ज करत असतात. विशेष म्हणजे अनाथ किंवा आर्थिक दुर्बल घटकांतील उमेदवाराला केवळ १०० रूपये कमी करून परीक्षा शुल्क ९०० रूपये करत चेष्टा केली आहे. सरकारने एकाच वर्गाच्या पदासाठी एकदाच शुल्क घ्यावे जेणे करून उमेदवारांना सोयीचे होईल असे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी निवेदनात म्हटले आहे. भरती प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या उमेदवारांकडून नाममात्र १०० रूपये परीक्षा शुल्क आकारावे अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेने मार्फत सरकारला करण्यात आली आहे. या मागणीचा सकारात्मक विचार करावा असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# ठाण्यात यांत्रिक पद्धतीने सफाई करणाऱ्या दोन मशीनचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण



## ठामपाने घेतल्या दोन गाड्या

### आणखी चार गाड्या लवकरच सेवेत होणार दाखल




*ठाणे : 'मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे' या मोहिमेत ठाणे महापालिका क्षेत्रात रस्ते, शौचालये, स्वच्छता आणि सुशोभीकरण यांची कामे सुरू आहेत. याच मोहिमेत ठाण्यातील मोठ्या रस्त्यांची सफाई करण्यासाठी ६ सफाई यंत्रे घेण्यात येणार आहेत. त्यापैकी पहिल्या दोन सफाई यंत्रांचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी, ठामपाआयुक्त अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त-२ संजय हेरवाडे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) तुषार पवार उपस्थित होते.*

ठाणे शहरातील मुख्य रस्ते तसेच पूर्व द्रुतगती महामार्गावरील रस्त्यांची सफाई या यंत्रांद्वारे करण्यात येणार आहे. शनिवार सकाळपासून या गाड्यांच्या माध्यमातून पूर्व द्रुतगती महामार्ग, वागळे इस्टेट या परिसरात सफाई सुरू करण्यात आली. सद्यस्थितीत, अशी यंत्रे बसवलेल्या दोन गाड्या महापालिकेकडे आल्या आहेत. एक गाडी दिवसभरात सुमारे ४० किमी रस्त्यांची सफाई करू शकेल. ही यंत्रे असलेल्या आणखी चार गाड्या उपलब्ध करून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्या लवकरच ठाणेकरांच्या सेवेत दाखल होतील. या गाड्यामुळे शहरातील मोठ्या रस्त्यांची सफाई जलदगतीने होण्यास मदत होईल. रस्त्यावरील कचरा, रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर साठणारी धूळ काढण्याचे काम या गाड्या करतील. त्याचबरोबर शहरातील छोट्या गल्ल्यांमध्ये साफसफाई व्हावी, या दृष्टीने लहान इलेक्ट्रीकल गाडी आणण्याचाही विचार असल्याची माहिती आयुक्त बांगर यांनी दिली.

यांत्रिक पद्धतीने केली जाणारी सफाई ही मनुष्यबळाचा वापर करून होत असलेल्या सफाईला पर्याय ठरू शकत नाही. परंतु, यांत्रिक पद्धतीने सफाई सुरू केल्यामुळे त्या ठिकाणचे मनुष्यबळ इतर रस्त्यांवरील सफाईसाठी वापरणे शक्य होईल. जेणेकरून मनुष्यबळाद्वारे केल्या जाणाऱ्या सफाईची कार्यक्षमता वाढवता येईल, असे आयुक्त बांगर म्हणाले. यांत्रिक पद्धतीने सफाईमध्ये मशीनची देखभाल आणि दुरूस्ती हा कळीचा मुद्दा असतो. मशीन नवीन असताना जी कार्यक्षमता असते ती मशीन जुनी व्हायला लागल्यावर कमी होणे अपेक्षित नाही. त्यामुळे, संपूर्ण कालावधीत सफाईची कार्यक्षमता समान राहील, देखभाल आणि दुरुस्ती अत्युच्च दर्जाची राहील, याच्या सूचना कंत्राटदारास देण्यात आल्या आहेत, असेही आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले. यांत्रिक सफाईमुळे रस्त्यावरील कचरा उचलण्यास मदत होईल. तसेच, रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला असलेली धूळ साफ करण्यास मोठी मदत होईल. महापालिका क्षेत्रातील प्रमुख रस्ते, काँक्रिटचे रस्ते यांची सफाई या पद्धतीने करण्याचे महापालिकेचे नियोजन असल्याचे आयुक्त बांगर यांनी सांगितले.

# मालमत्ता करामधील १० टक्क्यांची सवलत ३० जूनपर्यंत

## सवलत योजनेस करदात्यांचा प्रतिसाद

**ठाणे:** मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. करदात्यांनी आपला कर महापालिकेकडे विहित मुदतीत जमा करावा यासाठी महापालिकेच्या माध्यमातून जे करदाते ०१ एप्रिलपासून ते १५ जून २०२३ या कालावधीत पहिल्या सहामाहीच्या करासोबत दुसऱ्या सहामाहीचा कर भरतील अशा नागरिकांना १० टक्के सवलत जाहिर केली होती. या सवलत योजनेस करदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून पहिल्या तिमाहीत एकूण २५३.८६ कोटी विक्रमी वसुली झाली आहे. गेल्यावर्षीत याचदरम्यान १८५.८६ कोटी इतकी वसुली झाली होती. म्हणजेच गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा ३६ % जास्त वसुली झाली आहे. या पार्श्वभूमीवर ही सवलत येत्या ३० जून पर्यंत वाढविण्यात आली असून नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केले आहे.

### करवसुलीसाठी उपाययोजना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिक/ करदात्यांना मालमत्ता करसंलग्न सोयी सुविधा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. यामध्ये करदाते त्यांच्या घरातून अथवा कार्यालयातून इतर ठिकाणाहून मालमत्ता करसंलग्न सर्व सोई-सुविधा वापरु शकतील. आपल्या मालमत्तेवर किती कर प्रलंबित आहे, जर दंड आकारण्यात आला असेल तर त्याची रक्कम किती आहे, मालमत्ता कर भरणा कोणकोणत्या पध्दतीने करता येईल अशा सर्व प्रश्नांची उत्तरे नागरिकांना महानगरपालिकेच्या वेबसाईटद्वारे घरच्या घरी मिळू शकतील अशी कार्यप्रणाली राबविण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारच्या माहितीसाठी महानगरपालिकेच्या कार्यालयात येण्याची व कोणास भेटण्याची गरज पडू नये अशा पध्दतीने प्रक्रिया सुलभ होईल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

### प्रभाग कार्यालयात संकलन केंद्रे

मालमत्ता कर भरण्यासाठी ठाणे महापालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयात संकलन केंद्रे सुरू करण्यात आलेली आहेत. मालमत्ताधारकांना या केंद्रावर सोमवार ते शनिवार सकाळी १० सायंकाळी ५ वाजेपर्यंत या वेळेमध्ये मालमत्ता कर जमा करता येईल. त्याशिवाय, ऑनलाईन कर भरणा सुविधाही कार्यरत आहे.

# टाकाऊ संगणकीय साहित्यापासून नवी मुंबईच्या आकर्षक नकाशाची

## श्री आर अंतर्गत निर्मिती

**नवी मुंबई :** पुर्वेकडील सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि पश्चिमेकडील खाडीकिनारा यामध्ये वसलेले नवी मुंबई शहर सुनियोजित बांधणीचे आधुनिक शहर म्हणून नावाजले जाते. १०९.५९ चौ.कि.मी. क्षेत्रात विस्तारलेली नवी मुंबई दिघा, ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, वाशी, नेरुळ, बेलापूर अशा ८ विभागांत सामावलेली आहे. अशा नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचे विहंगम दर्शन घडविणारा नकाशा नुकताच महापालिका आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांच्या दालनात प्रदर्शित करण्यात आला असून या नकाशाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची निर्मिती टाकाऊ संगणकीय साहित्यापासून करण्यात आलेली आहे.

यापूर्वी महापालिका मुख्यालयात घनकचरा व्यवस्थापन विभागात लावण्यात आलेल्या संगणकीय टाकाऊ साहित्यापासून तयार केलेल्या मदर इंडिया बोर्ड स्वरुपातील भारताच्या नकाशा ची विक्रमी नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये राष्ट्रीय पातळीवर झालेली असून अशाच प्रकारचा नकाशा कोपरखैरणे येथील स्वच्छता पार्कमध्ये लावण्यात आला आहे. हे नकाशे संगणकातील अथवा लॅपटॉपमधील विविध टाकाऊ साहित्यापासून बनविण्यात आले आहेत. याच धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा ५ फूट उंचीचा नादुरूस्त संगणक व लॅपटॉपधील मदरबोर्ड व इतर साहित्यापासून तयार केलेला नकाशा महापालिका मुख्यालयातील आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या दालनात प्रदर्शित करण्यात आला आहे.

# जिल्हयातील 'त्या' चौघींना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्काराने गौरविले

## पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते वितरण









**ठाणे:** महिलांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील चार महिलांना बुधवारी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्काराने राज्याचे उत्पादन शुल्क तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

महिला व बालविकास विभागाच्या वतीने हे पुरस्कार देण्यात येतात. जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास आमदार किसन कथोरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, ठाणे शहर पोलीस आयुक्त जय जित सिंग, ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त राजेश नार्वेकर, कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. भाऊसाहेब दांगडे, मीरा भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पांडे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, जिल्हा पोलिस प्रमुख विक्रम देशमाने, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड आदी उपस्थित होते.

### या आहेत सत्कारमूर्ती

महिलांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल जिल्ह्यातील काशीबाई एकनाथ जाधव, शोभा दीपक वैराळ, अनिता दळवी व सारिका भोईटे पवार यांना ठाणे पालकमंत्री देसाई यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, दहा हजार रुपये रोख, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

## हिरकणी कक्षाचे उद्घाटन

*महिला व बालविकास विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय व ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे उद्घाटन पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते झाले. जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच पोलीस आयुक्तालयात विविध कामांसाठी मोठ्या प्रमाणात नागरिक येत असतात. त्यामध्ये लहान मुले घेऊन येणाऱ्या महिला तसेच स्तनदा मातांचा समावेश असतो. या महिलांना त्यांच्या लहान मुलांना खाऊ घालणे व स्तनपानासाठी जागा उपलब्ध व्हावी, यासाठी या हिरकणी कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये आरामाची सोय, पाण्याची व्यवस्था, मुलांसाठी खेळणी आदींची सोय करण्यात आली आहे.*

*यापूर्वी पोलीस अधिक्षक कार्यालयातही हिरकणी कक्ष उभारण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यातील गर्दीच्या विविध सात ठिकाणी हिरकणी कक्षाची उभारणी करण्यात येणार आहेत.*



# अधिकाधिक गिरणी कामगारांना घरे मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील

**मुंबई :** गिरणी कामगारांचे मुंबईच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे. अधिकाधिक गिरणी कामगारांना घरे मिळवून देण्यासाठी जागेचा शोध घेतला जात असून त्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. गिरणी कामगारांना शासन वाऱ्यावर सोडणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे सन २०२० मध्ये गिरणी कामगारांसाठी जाहीर करण्यात आलेल्या सदनिका सोडतीतील बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिलमधील पात्र व सदनिकेच्या विक्री किंमतीचा व मुद्रांक शुल्काचा भरणा केलेल्या पात्र १६२ यशस्वी गिरणी कामगार/ वारसांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सदनिकांच्या चाव्या व वितरणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी शिंदे बोलत होते.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या कार्यक्रमाला कामगार मंत्री सुरेश खाडे, कृषिमंत्री अब्दुल सत्तार, आमदार प्रवीण दरेकर, कालिदास कोळंबकर,



–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

गिरणी कामगार समितीचे अध्यक्ष व आमदार सुनील राणे, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी (अतिरिक्त कार्यभार) अरुण डोंगरे आदी उपस्थित होते.

सदनिकेच्या चाव्या मिळत असलेल्या गिरणी कामगारांना सदनिका विक्री किंमतीचा भरणा उशिरा केल्याबद्दल लावलेला दंड माफ करून १ जुलै २०२३ पासून सदनिकेसाठीचा देखभाल- दुरुस्ती खर्च आकारण्याचे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिले. कायदे हे सर्वसामान्यांसाठी असावेत, ही शासनाची भूमिका असून योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना शासनाकडे येण्याची वेळ येवू नये, यासाठी 'शासन आपल्या दारी' हा कार्यक्रम राबवित आहोत. आतापर्यंत राज्य शासनाने सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले. गिरणी कामगारांना सदनिका खरेदी करण्यासाठी मुंबई बँकेने कर्ज दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी बँकेचेही आभार मानले.

# ठामपा शाळांमधील विद्यार्थ्यांचे रांगोळीने तसेच गुलाबपुष्प देवून स्वागत

## शाळेच्या पहिल्याच दिवशी नवीकोरी पुस्तकांचे वाटप

**ठाणे : रांगोळ्या.. गुलाबपुष्प.. गोड पदार्थ आणि चॉकलेट देत प्रवेश दिंडी काढून शाळेच्या पहिल्या दिवशी ठाणे महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांचे स्वागत शिक्षकांनी केले. अत्यंत भारलेल्या अशा वातावरणात विद्यार्थ्यांनीही शिक्षकांकडून स्वागत स्वीकारुन शाळेचा प्रवेशोत्सव साजरा केला.**





ठाणे महानगरपालिका शाळांची सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाची सुरूवात दमदार, उत्साहवर्धक करण्यासाठी ठामपाच्या सर्व शाळांना शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. दोन महिन्यांच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर विद्यार्थी उत्साहात शाळेत यावे व शाळेमध्ये देखील चैतन्याचे, उत्साहवर्धक वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. तसेच महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी नवीकोरी पाठ्यपुस्तके मिळाल्याने त्यांचा आनंद द्विगुणित झाला.

शाळेत प्रवेश झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनात गोड पदार्थ देण्यात आला. विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी नवी कोरी पाठ्यपुस्तके मिळाल्याने त्यांच्या आनंदात आणखीनच भर पडली. ठाणे महानगरपालिकेच्या एकूण १३६ शाळांमधून अंदाजे ३३ हजार ००६ विद्यार्थी शिक्षण घेत असून शाळेच्या पहिल्याच दिवशी सरासरी ६६% विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदवली. विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी परिसरातील मान्यवर व्यक्ती, लोकप्रतिनिधी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित असल्याचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी नमूद केले. ठाणे महापालिकेने राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

# अल्प उत्पन्न गटामधील कुटुंबातील सदस्याच्या अत्यंविधीचा खर्च पालिकेने उचलावा

## प्रताप सरनाईक यांची मागणी



**ठाणे:** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने १ जून, २०२३ रोजी पासून अल्प उत्पन्न गटातील कुटुंबातील सदस्याचे निधन झाल्यास त्याच्या अंत्यविधीचा पुर्ण खर्च पालिका प्रशासन उचलणार आहे. त्याच धर्तीवर ठाणे महानगरपालिका हद्दीतील अल्प उत्पन्न गटातील म्हणजेच केशरी व पिवळ्या शिधापत्रक धारकांच्या कुटुंबातील सदस्याचे निधन झाल्यास त्याच्या अंत्यविधीचा पुर्ण खर्च ठाणे महानगरपालिकेने करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये वेगवेगळ्या धर्माची, समाजाची लोक मोठ्या प्रमाणात राहत आहेत. यामध्ये अत्यल्प, मध्यम तसेच अल्प उत्पन्न गटातील लोकांचा समावेश असून त्यापैकी अल्प उत्पन्न गटातील म्हणजेच केशरी व पिवळ्या शिधापत्रक धारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहेत.जीवन कितीही सुंदर असले तरी मृत्यु हे शाश्वत असून मृत्यु झाल्यानंतर त्या व्यक्तीचे धर्मानुसार, समाजानुसार अंत्यविधी प्रक्रिया पार पाडावी लागते. मृत व्यक्तीचे पार्थिव कुटुंबियांनी दहनासाठी पालिकेच्या स्मशानभूमीत आणल्यानंतर दहनासाठी किंवा दफनभूमीमध्ये खड्डा (कबर) खोदण्यासाठीचा खर्च संबंधित कुटुंबातील सदस्यांनी करावा लागतो. सदरहू खर्च हा अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना परवडणारा नसल्यामुळे मृत व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यांना एखाद्या दानशूर व्यक्तीकडे अंत्यविधीच्या सामानासाठी भिक मागावी लागते, ही दुर्दैवी बाब आहे. असे दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. तसेच सरनाईक यांनी सुचविल्यानुसार लवकरात लवकर धोरणात्मक निर्णय घेऊन यासंदर्भातील निर्णय जाहिर करू असे आश्वासन दिलेले आहे. असेही सरनाईकांनी स्पष्ट करत, पिवळे व केशरी रेशनकार्डधारकांना अंत्यविधीसाठी मोफत साहित्य देण्यात येणार असल्यामुळे महापालिकेवर सुमारे ५ कोटी रूपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे. तो उचलण्याची तयारी आयुक्तांनी दाखविल्यामुळे हा निर्णय ठाणे महानगरपालिकेच्या वतीने लवकरच जाहिर करण्यात येईल.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही आयुक्त अभिजित बांगर यांना यासंदर्भात निर्णय घेण्यास सांगितले आहे. असेही सरनाईक यांनी म्हटले आहे.

# १०८ रुग्णवाहिका ठरतेय जिल्ह्यात 'जीवनदायी'

## महिन्याभरात सुमारे ४ हजारांच्या हाकेला झाली दाखल

**ठाणे:** आणीबाणीच्या काळात शासनाच्या माध्यमातून रुग्णांना मोफत व जलद वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी १०८ रुग्णवाहिका सुरु करण्यात आली आहे. हीच रुग्णवाहिका मे महिन्यात ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात जीवनदायी ठरल्याचे पाहण्यास मिळाले आहे. या महिन्यात सुमारे चार हजार रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या हाकेला धावून त्यांचे जीव वाचविण्यात लाखमोलाची जबाबदारी १०८ रुग्णवाहिकेने पार पाडली आहे.

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीमध्ये जखमी झालेल्या रुग्णांना मोफत व जलद वैद्यकीय मदत मिळावी यासाठी २०१४ मध्ये १०८ रुग्णवाहिकेची सेवा सुरू केली. आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय उपचारासाठी सुरू करण्यात आली आहे. अपघातग्रस्तांना लगेचच आवश्यक प्राथमिक उपचार मिळाल्याने अनेकांचे प्राण वाचले आहेत. आतापर्यंत विविध १३ प्रकारच्या वैद्यकीय आपत्कालीन स्थितीतील रुग्णांना वेळेत उपचार मिळत आहेत. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मे महिन्यात ३ हजार ९०२ रुग्णांना १०८ रुग्णवाहिकेची सेवा पुरविण्यात आली आहे. यामध्ये रस्ते अपघातातील ६९ रुग्णांना, वैद्यकीय उपचारासाठी सर्वाधिक २ हजार ९२२ रुग्णांना, ४१४ गरोदर मातांना, कार्डियाक आजाराच्या ६१ रुग्णांसह आदी आजारातील रुग्णांचा समावेश असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागाने दिली.

# होर्डिंग पडून जीवीतहानी झाल्यास होर्डिंग्ज मालकावर होणार सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

## - आयुक्त अभिजीत बांगर



## शहरातील सर्व होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे अनधिकृत होर्डिंग्ज तातडीने काढावेत

**ठाणे :** वादळी वाऱ्यामुळे ठाणे शहरात पावसाळ्यात होर्डिंग्ज, झाडे उन्मळून पडणे तसेच झाडाच्या फांद्या पडून जीवीत वा वित्तहानी होवून नुकसान होणार नाही या दृष्टीने शहरातील सर्व होर्डिंग्ज व होर्डिंग्ज टॉवरचे स्ट्रक्चर ऑडिट करावे. तसेच शहरातील अनधिकृत मेटल स्ट्रक्चर निष्कसित करावीत, शहरातील होर्डिंग्ज पडून जर दुर्घटना घडली तर संबंधित होर्डिंग्ज कंपनीच्या मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा व शहरातील अनधिकृत होर्डिंग तात्काळ हटविणे आणि रस्त्यांच्या कडेला असलेल्या व इतर ठिकाणच्या धोकादायक झाडांच्या फांद्यांच्या छाटणीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी मंगळवारी झालेल्या बैठकीत संबंधित विभागाला दिले आहे.

शहरातील होर्डिंगचे कालबद्ध पध्दतीने स्ट्रक्चरल ऑडिट व्हावे यासाठी कालमर्यादा निश्चित करावी व अस्तित्वातील सर्व होर्डिंग टॉवरचे स्ट्रक्चरल ऑडिट संबंधितांकडून पंधरा दिवसात करुन घ्यावेत. स्ट्रक्चर ऑडिटनंतर जे होर्डिंग सुरक्षित नसल्याचे आढळल्यास ते होर्डिंग तात्काळ काढण्याची जबाबदारी ही संबंधित कंपनीची असेल, त्यानंतरही जर एखादी दुर्घटना घडून एखाद्याचा मृत्यू झाल्यास संबंधित कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाईल.

तसेच जे १५ दिवसांत स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल सादर करणार नाहीत अशा होर्डिंगची एक वर्षाची परवानगी रद्द केली जाईल असे आयुक्त बांगर नमूद केले. तसेच परवाना विभागाने शहरातील सर्व अनधिकृत होर्डिंग्जचा शोध घेवून त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट न करता सदरची होर्डिंग्ज तात्काळ हटविण्याची कार्यवाही करावी. महापालिकेच्या विविध प्रभागसमिती क्षेत्रात मेटल स्ट्रक्चरच्या माध्यमातून परवानगी न घेता अनधिकृत होर्डिंग उभारण्यात आले आहेत. अशाप्रकारचे मेटल स्ट्रक्चरवरील होर्डिंग १५ दिवसांत प्रभाग समिती निहाय सर्व सहाय्यक आयुक्तांनी अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या साह्ययााने हटविण्याची कार्यवाही करावी. कोणत्याही परिस्थितीत होर्डिंग पडून दुर्देवी घटना घडणार नाही याची दक्षता घेवून कार्यवाही करावयाची आहे. भविष्यात अनधिकृत मेटल स्ट्रक्चर किंवा अनधिकृत होर्डिंग पडून एखादी अप्रिय घटना घडल्यास संबंधित सहाय्यक आयुक्तांवर जबाबदारी निश्चित केली जाईल, याबाबत बेजबाबदारपणा चालवून घेतला नाही असा सूचक इशारा देत यावर प्रत्येक परिमंडळ उपायुक्तांचे त्यांचेवर सनियंत्रण राहिल असेही आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, शंकर पाटोळे, प्रशांत रोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीष झळके, वृक्ष अधिकारी केदार पाटील आदी उपस्थित होते.

# प्रशासकीय सेवेत काम करताना विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन व भूमिका महत्वाची



## सी.डी. देशमुख प्रशाकीय प्रशिक्षण संस्थेत स्पर्धा परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन

**ठाणे :** प्रशासकीय सेवेत काम करताना विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन व भूमिका कशी असावी. आपण समाजात काम करणार असल्यामुळे समाजाप्रती व नागरिकांप्रती कोणती भावना असावी याचबरोबर स्पर्धा परीक्षेची तयारी करताना मेहनत आणि संघर्ष फार महत्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी आपली आवड काय आहे हे ठरविणे महत्वाचे आहे, आवड व कल विचारात घेवून आपले ध्येय ठरविले तर नक्कीच यश मिळते असे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नमूद केले.

महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी दिलेल्या निर्देशानुसार चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या मुख्य केंद्रात केंद्रीय लोकसेवा आयोग यूपीएससी २०२२ या स्पर्धा परीक्षेत ठाणे व मुंबई परिसरातील यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आणि संस्थेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व संवाद व विशेष व्याख्यानाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

या व्याख्यानास ठाणे, नवी मुंबई व मुंबई शहरातील विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी मोठया संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. प्रश्न-उत्तरांच्या माध्यमातून व्याख्यानाला आलेल्या प्रशिक्षणार्थींना हसत-खेळत अगदी खेळीमेळीच्या वातावरणात सुसंवाद साधुन- प्रशिक्षणार्थींच्या मनातले अनेक समज व गैरसमज दुर करून यूपीएससी २०२२ या स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांनी सी. डी. देशमुख या संस्थेतील प्रशिक्षणार्थी/विद्यार्थ्यांना बहूमुल्य असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात संस्थेचे संचालक महादेव जगताप यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक सादर केले. भविष्यात संस्थेमार्फत पूर्ण करण्यात येणाऱ्या उदिदष्टांची माहिती दिली. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गिरीश झेंडे यांनी केले.

# आरटीओचा 'हेल्मेट' सक्तीसाठी जनजागृतीवर भर

**ठाणे :** रस्ते अपघातात ७० ते ८० टक्के प्रमाण दुचाकी आणि पादचाऱ्यांचे आहे. हेल्मेट न घातल्याने राज्यात सात हजार ७०० लोकांचा मृत्यू झाला आहे. ही चिंताजनक बाब असून, मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी दुचाकी चालवताना हेल्मेट परिधान करणे बंधनकारक आहे. त्यासाठी सर्व शासकीय कार्यालय आणि ३५० हून अधिक खाजगी आस्थापनात दुचाकी घेऊन येणाऱ्या दुचाकीस्वारांना 'हेल्मेट असेल तरच प्रवेश द्यावा' असे परिपत्रक प्रादेशिक परिवहन विभागाने काढले आहे. यासंदर्भात गृहनिर्माण सोसायटी समोरच जनजागृतीपर जाहिरात फलक लावण्यात येणार आहे. या अनोख्या उपक्रमाद्वारे हेल्मेटसक्ती केली जाणार आहे.

## नव्याने काढले परिपत्रक




शहरात वाहनांची संख्या कमी होण्याऐवजी ती प्रचंड झपाट्याने वाढताना दिसत आहे. त्यातच होणाऱ्या रोड अपघातात प्रामुख्याने दुचाकीस्वारांना आपले जीव गमावण्याची वेळ ओढवते. त्याला प्रमुख कारण विना हेल्मेट हेच आहे. अपघात आणि त्यामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या काही केले कमी होताना दिसत नाही. त्यातच मृत्युमुखी पडण्याची संख्या रोखण्यासाठी हेल्मेट परिधान करणे किती आवश्यक हे सांगितले जात आहे. आता त्याही पुढे जाऊन प्रादेशिक परिवहन विभागाने त्याच्या सक्तीसाठी अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच एक परिपत्रक ही जारी केले आहे. यामध्ये शासकीय असो या खाजगी आस्थापना मध्ये दुचाकी घेऊन येणाऱ्या प्रत्येकाला हेल्मेट घालणे अनिवार्य करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत. म्हणजे हेल्मेट असेल तरच प्रवेश द्या असे म्हटले आहे. यासाठी आरटीओ विभाग तसे जाहिरात फलक गृहनिर्माण सोसायटीच्या बाहेर लावणार आहे. अशी माहिती आरटीओ ने दिली.

> *हेल्मेट असेल तरच प्रवेश... असे फलक प्रादेशिक परिवहन विभागाने तयार केले आहेत. हेल्मेट संदर्भात परिपत्रक सर्व शासकीय कार्यालयात दिलेली आहेत. सोबत खाजगी कंपनी कारखाने आदी आस्थापन यांना ही दिली आहेत. मोटर वाहन कायदा १९८८ मधील कलम १९४ ड तरतूदी नुसार हेल्मेट वापरा संबंधी तरतुदीचा भंग करणाऱ्या वर दंडात्मक कारवाई केली जाईल. जास्तीत जास्त दुचाकी स्वारांनी हेल्मेट घालावे या करीता गृहनिर्माण सोसायटी यांना देखील या बाबतचे फलक दिले जाणार आहेत.*
>
> **– जयंत पाटील,** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,ठाणे

# मुंब्रा धर्मांतरण प्रकरणी आता उत्तर प्रदेश सरकारने माफी मागावी



## डॉ.जितेंद्र आव्हाड यांची मागणी

**ठाणे :** मुंब्रा येथे झालेल्या कथीत धर्मांतराबद्दल पोलिसांनी कोणत्याही प्रकारची तक्रार आलेली नाही, असे स्पष्ट केलेले आहे. त्यावरुन महाराष्ट्राला बदनाम करण्याची आणि महाराष्ट्रात अस्वस्थता पसरवून एका समाजाला बदनाम करुन त्याद्वारे दोन धर्मांमध्ये द्वेष निर्माण करण्याची तसेच मुंब्रा-कौसा बदनाम करुन आपणाला बदनाम करण्याचा हा कट होता. आता हा कट उघडकीस आला आहे. त्यामुळे उत्तरप्रदेश सरकारने माफी मागावी तसेच महाराष्ट्र सरकारनेही आपली नाराजी उत्तर प्रदेशला कळवावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा माजी मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी ठाण्यात झालेल्या एका पत्रकार परिषदेत केली. तसेच महाविकास आघाडी राज्यात २०० जागांवर निवडून येतील असा दावा ही त्यांनी यावेळी केला.

डॉ. आव्हाड म्हणाले की, मुंब्रा येथे कोणत्याही प्रकारचे धर्मांतर झालेले नाही आणि तशी कोणतीही माहिती आम्हाला प्राप्त नाही, अशी घोषणा ठाणे पोलिसांनी केली आहे. ही आनंददायी घोषणा आहे. उत्तर प्रदेशच्या गाझीयाबादमधील अधिकाऱ्याने चारशे जणांचे धर्मांतर झाले, असे म्हटले. त्यामुळे ठाणे पोलिसांचीही लाज गेलेली आहे. मुस्लीमांबद्दल द्वेष निर्माण करण्यासाठी हिंदू समाजाला वेगळी दिशा दाखवण्यात आला. त्यातून दोन्ही समाजांमध्ये द्वेष निर्माण करण्याचा उद्देश होता. हिंदू समाज काय एवढा अरिपक्व आहे की तो धर्मांतराचा रस्ता निवडेल. ही महाराष्ट्राला बदनाम करण्याची आणि महाराष्ट्रात अस्वस्थता पसरवून एका समाजाला बदनाम करुन त्याद्वारे दोन धर्मांमध्ये द्वेष निर्माण करण्याची तसेच मुंब्रा-कौसा बदनाम करुन आपणाला बदनाम करण्याचा हा कट होता. पण, पहिल्या तासातच आपण आव्हान दिल्याने कोणाला काही करता आले नाही अन् त्याला माघार घ्यावी लागली. त्यामुळे राज्य सरकारने हे गांभीर्याने घ्यावे. तसेच, उत्तर प्रदेशने माफी मागायला हवीच शिवाय ठाणे पोलिसांनीही उत्तर प्रदेश सरकारला एक नाराजीचे पत्र उत्तर प्रदेश सरकारला पाठवायला हवे की तुम्ही असे बेजबाबदार वर्तन तुम्ही करु शकत नाही, असे ठणकावायला हवे. आज मुंब्रा परिसर हा ठाण्यातील कोणत्याही भागापेक्षा चांगला आहे. म्हणजे कळवा-मुंब्रा भागाची सुंदर प्रगती होत आहे. ही प्रगती बघवत नसल्यानेच हे षडयंत्र रचण्यात आले.

हा दंगल पेटवण्याचा कट होता का, असे पत्रकारांनी विचारले असता, हा दंगल पेटवण्याच्या कटाचा एक भाग होता. येथील एका समाजाची प्रतिमा राक्षस अशी उभी करुन त्याचे भय निर्माण करायचा प्रकार सुरु झाला होता. हा प्रकार अत्यंत खालच्या स्तरावरील आहे. महाराष्ट्रामध्ये जेथे कधी दगड उचलला गेला नाही. तिथे दंगली घडविण्यात आल्या आहेत. ज्या कोल्हापूरवर छत्रपती शाहू महाराजांचे संस्कार आहेत; जिथे सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकसंघ ठेवून नगर उभारले. तिथे दगड उचलले जात आहेत. आज वाईट वाटते की तिथे पानसरे-एन.डी. पाटील नाहीत; ते दोघे असते तर त्यांनी रस्त्यावर उतरुन शांतता निर्माण केली असती, असे डॉ. आव्हाड म्हणाले. शहानवाजच्या अटकेसंदर्भात विचारले असता, जर कोणी दोषी असेल तर त्याला फासावर चढवा. पण, एका प्रगतशील शहराला बदनाम का करत आहात. चारशे जणांच्या नावाने सबंध शहर बदनाम कसे काय करु शकता? गेल्या २० वर्षात विशेषत: सन २००९ पासून येथे कधीच जातीय तणाव निर्माण झालेला नाही. मुंब्रा-कळव्याचा जो विकास झालेला आहे. त्यामुळेच तेथील लोक आपणावर प्रेम करीत आहेत. तेथील नागरिक आणि आपली बांधिलकी आहे. हेच विरोधकांना झेपत नाही. त्यामुळेच कसेही करुन मला रोखण्यासाठी ही बदनामी केली जात आहे. त्यासाठी गुन्हे दाखल करा; खोटा बातम्या पसरवा असा प्रकार केला जात आहे. पण, आता सत्य बाहेर आलेच नाही. पाच दिवसांनी पोलिसांनी खरे काय ते सांगितले ना! आम्ही यादीच मागितली होती. पण, पोलीस वेळ काढत होते. गाझीयाबाद पोलिसांचे म्हणणे रेटत होते. जर, या पोलिसांसमोर असे धर्मांतर झाले असेल तर ते पोलिसांचेच अपयश आहे. त्यावर बोला ना! जर तुमची चूक नाही तर ते थेट बोला ना. या बाबत आपण गृहमंत्र्यांना पत्र लिहून महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी उत्तर प्रदेश सरकारला आपली नाराजी कळवण्याबाबत सांगणार आहेत, असेही डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.

### महाविकास आघाडीच्या २०० जागा येणार

***सर्व्हे काय सांगतात हे माहित नाही. पण, आपण राज्यभर फिरत आहोत. जे पाहतो ते सांगतो की, महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या २०० जागा आल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणूनच दंगली , अफवा पसरविल्या जात आहेत. विकासकामे नाहीत, बेरोजगारी- महागाई वाढली आहे. राज्यात अस्थिरता वाढली आहे. म्हणूनच नको त्या अफवा पसरवल्या जात आहेत. आमच्या सर्व्हेनुसार आम्हाला २०० जागा मिळणारच आहेत.***

# मद्यपींनो सावधान

## ...जर अवैध धाब्यावर मद्यपान कराल तर...




## राज्य उत्पादन शुल्क विभागाने थोपटले दंड

### विशेष मोहिमेंतर्गत केले १६ गुन्हा दाखल तर २० जणांना अटक

*ठाणे : चोरट्या मार्गे दीव दमन आणि गोवा निर्मित मद्याची विक्री करणाऱ्यांबरोबर गावठी दारू निर्मितीशिवाय विक्री करणाऱ्यानंतर आता ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध धाब्यांकडे मोर्चा वळवला आहे. तसेच त्या धाब्यांवर मद्यप्राशन करणाऱ्यांना पकडून त्यांच्यावर दंडात्मक कारवाईची विशेष मोहीम हाती घेतली आहे. उत्तन, कल्याण- डोंबिवली, टिटवाळा आणि नवीमुंबई या ठिकाणावर ही दोन ते चार दिवसात केलेल्या कारवाई करत १६ गुन्हे दाखल केले आहेत. तसेच त्या गुन्हयात २० जणांना अटक केली आहे. तर या मोहिमेत गावठी दारू,विदेशी मद्य असा ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिली. जर अवैधरित्या धाब्यांवर बसून मद्य ठोसत असला तर यापुढे सावधान राहा कारण की येथे धोका आहे. असेच म्हणण्याची वेळ आली आहे.*

*अथवा मोकळ्या भूखंडावर अनेक अनधिकृत धाबे उभे राहिले आहेत किंवा राहत आहेत. धाबे संस्कृतीमुळे जरा हटके चवीचा आस्वाद घेता येतो. याशिवाय मद्याच्याही पार्ट्या रंगू लागल्या आहेत. त्याला नागरिकांची पसंती मिळू लागल्याने अवैधरित्या धाब्यांची संख्याही वाढू लागली आहे. या वाढत्या अवैध धाब्यांवर सर्रास मद्याची विक्री होई लागली आहे. त्यामुळेच ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाने आता त्यांच्याकडे आपला मोर्चा वळवून या अवैध मद्यविक्रीवर वेळी नियंत्रण ठेवण्यासाठी चांगले दंड थोपटले आहे. तेथे बिनधास्तपणे मद्यप्राशन करणाऱ्यांची धरपकड करून त्यांच्याकडून दंड वसूल केला जात आहे. अशाप्रकारे ठाणे जिल्ह्यातील उत्तन भागात गावठी दारूच्या गुत्त्यांवर कारवाई करत कलम ६५ ई, ६८ व ८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्या गुत्त्याचे दोन मालक आणि १८ तळीराम यांना ताब्यात घेतले. त्यांना न्यायालयाने एक लाख ५४ हजारांचा दंड ठोठावला. याशिवाय कल्याण,टिटवाळा डोंबिवली, नवीमुंबई या परिसरात असणाऱ्या अनधिकृत धाब्यावर दारू पिणाऱ्यांवर कारवाई केली असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिली आहे.*

> ***अवैध धाब्यांविरोधात विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्या मोहिमेअंतर्गत एकूण १६ गुन्हे दाखल केले. तसेच २० मद्यप्राशन करणाऱ्यांना अटक केली. तसेच या कारवाईत १८.४ लिटर विदेशी मद्य,३१.२५ लिटर देशी मद्य, ३३.५ लिटर बीअर, ११० लिटर गावठी दारू असा मिळून ५५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.***
>
> ***– डॉ. निलेश सांगडे, जिल्हा अधीक्षक, उत्पादन शुल्क विभाग, ठाणे***

# शासनमान्य शाळेत प्रवेश घ्या

## मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल

**ठाणे :** प्राथमिक शिक्षण विभागामार्फत अनधिकृत शाळांवर कारवाई करण्यात आली आहे. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम १८(५) व १९ (१) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापनाला रक्कम एक लाख दंड व नोटीसच्या दिनांकापासून शाळा बंद न केल्याने पुढील प्रत्येक दिवशी दहा हजारप्रमाणे दंडाची कारवाई करण्याची तरतूद आहे. शासकीय कारवाई करताना ग्रामीण भागातील अनधिकृत शाळांना नोटिस बजावण्यात आली होती, त्यानंतर काही शाळा बंद करण्यात आल्या. ग्रामीण व इतरत्र शहरी भागातील अनधिकृत शाळेत पालकांनी प्रवेश घेऊ नये. काही शाळा बंद करण्यात आल्या असल्या तरी त्या पुन्हा सुरू करण्याची शक्यता असल्याने पालकांनी शाळेबद्दल माहिती घेऊनच प्रवेश घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांनी आले आहे.

> ***पालकांना जागृत करण्याच्या उद्देशाने अनधिकृत शाळांची यादी प्रसिध्द करत आहोत. पालकांनी शाळा संदर्भातील माहिती घेऊन शाळेत प्रवेश घेतले तर अनधिकृत शाळा बंद होतील.***
>
> ***– डॉ. भाऊसाहेब कारेकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक, ठाणे जिल्हा परिषद***

> ***विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये व शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शासन मान्यता असलेल्या शाळेत पाल्याचे प्रवेश घ्यावे.***
>
> ***– मनुज जिंदल, मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद***

### अनधिकृत शाळाची यादी

**अंबरनाथ तालुका**

१. गोकुळ कॉन्व्हेट स्कूल, अंबरनाथ

२. समर्थ स्कूल नेवाळी ता.अंबरनाथ.

३. सनशाईन इंग्लिश स्कूल, उमरोली, ता.अंबरनाथ.

४. विवेकानंद इंग्लिश स्कूल अडीवली, ता.अंबरनाथ

५. निलम इंग्लिश स्कुल अडीवली, ता.अंबरनाथ ६ गायत्री विद्यामंदीर, ता.अंबरनाथ.

७. ऑरबिट इंग्लिश स्कुल अडीवली प्राथमिक ता.अंबरनाथ.

८. गगनगिरी इंग्लिश स्कुल अडीवली प्राथमिक ता.अंबरनाथ.

**भिवंडी तालुका**

९. नॅशनल इंग्लिश स्कूल, दापोडे,ता.भिवंडी.

१०. देविका इंग्लिश मिडियम स्कूल काल्हेर, ता.भिवंडी.

११. द विनर्स इंग्लिश मिडियम स्कूल कांबे, ता.भिवंडी.

१२. अवेंचुरा इंग्लिश स्कूल कोन, ता.भिवंडी

१३. अग्निमाता इंग्लिश स्कूल पिंपळास, ता.भिवंडी

१४. व्हि.पी.इंग्लिश स्कूल पिंपळास, ता.भिवंडी

१५. समर्थ विद्यालय तलाईपाडा पिंपळनेर, ता.भिवंडी

१६. सुगराबिबी इंग्लिश स्कूल, तळवली, ता.भिवंडी

१७. ग्लोबल इंग्लिश स्कूल, वडूनघर, ता. भिवंडी

१८. इंग्लिश मिडीयम स्कूल, कुंदेफाटा, ता.भिवंडी

१९. इकरा इंग्लिश स्कूल, पडघा, ता.भिवंडी.

२०. प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडीयम स्कूल, भोईरपाडा, ता.भिवंडी

**कल्याण तालुका**

२१. जी.के. इंग्लिश हायस्कूल खडवली, ता.कल्याण

२२. डिन्गोटी कॉन्व्हेट स्कूला कोळेगांव, ता.कल्याण.

२३. नवज्योती बेथनी विद्यापिठ रुंदे, ता.कल्याण.

२४. युनिक इंग्लिश मिडियम स्कूल टिटवाळा, ता.कल्याण

२५. सरस्वती इंग्लिश स्कूल दहिसर, ता.कल्याण

२६. आयडीएल इंग्लिश स्कूल दहिसर, ता.कल्याण

२७. सावित्रिबाई फुले इंग्लिश प्रायमरी स्कूल– म्हारळ, ता.कल्याण

२८. सिबॉयसीस इंग्लिश स्कूल, कोंदेरी, ता.कल्याण

२९. रायन इंटरनॅशनल स्कूल, रुणवान गार्डनजवळ डोंबिवली (पु.) ता.कल्याण.

३०. बी.बी.आर.आर.टी..स्कूल, कांबा म्हारळ, ता.कल्याण.

**शहापुर तालुका**

३१. एम.आर.राणे इंग्लिश स्कूल, आसनगांव, ता.शहापुर

३२ शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल शेरे, ता.शहापुर

३३ एम.जे.वर्ल्ड इंग्लिश मिडीयम स्कूल आदिवली, ता.शहापुर